RCS. No. 55/2026

Exh. 5/D



रे.क.नं. /२०२६

# मे. दिवाणी न्यायाधिशसो क स्तर, पेठ वडगाव यांचे न्यायालयात.......

| | |
|---|---|
| **यशोदा उर्फ सखुबाई सर्जेराव चिखलकर**<br>व.व. ७१, धंदा. गृहीणी,<br>रा. थेरगाव, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापुर, | **वादी** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| **१) बाबुराव धोंडी चाळके (म.वा)**<br>**अ) अनिल बाबुराव चाळके**<br>व.व. ४६, धंदा. शेती<br>**ब) नवसाबाई बाबुराव चाळके**<br>व.व. ७६, धंदा. गृहीणी,<br>**क) छाया नंदकुमार शेळके,**<br>व.व. ४८, धंदा. गृहीणी,<br>१अ ते क रा. जुने पारगाव,<br>ता.हातकणंगले, जि.कोल्हापुर<br>**२) शिवाजी धोंडी चाळके**<br>व.व. ७६, धंदा. शेती,<br>रा. मोहरे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापुर<br>**३) रंगराव धोंडी चाळके**<br>व.व. ६९, धंदा. शेती, | **प्रतिवादी** |

Order
Issue notice to defendants

Sd/-
Jt. CJJD

26/1/26
Assistant Superintendant
Civil Court, Peth Vadgaon.

**४) विलास धोंडी चाळके**
व.व. ६१, धंदा. शेती,
३ व ४ रा. मौजे जुने पारगाव,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापुर

**५) मालुबाई शिवाजी जाखले**
व.व. ७४, धंदा. गृहीणी,
रा. कवठेपिराण,ता.तासगाव,जि.सांगली

**६) शालन आनंदा वडगावे**
व.व. ६६, धंदा. गृहीणी,
रा. कवठेपिराण,ता.तासगाव,जि.सांगली

**७) प्रताप जयवंत लोंढे**
व.व. ५०, धंदा. नोकरी,

**८) रणजित जयवंत लोढे**
व.व. ४६, धंदा. शेती,
७ व ८ रा. बिरदेव नगर, जुने पारगाव,
ता. हातकणंगले, ता. कोल्हापुर,

**प्रतिवादी**

**सी.पी.सी ऑर्डर ३९ रूल १,२ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई अर्ज.**

**यातील वादी यांचे मे. न्यायालयास नम्रपणे कळविणे की,**

**१) मिळकतीचे वर्णन :—**

अ) जिल्हा कोल्हापुर, ता.हातकणंगले, मौजे पारगाव येथील गट नं. ९२४/अ/२ (वर्ग २) यासी एकुण क्षेत्र ० हे. ४१ आर पैकी प्लॉट नं. ६६ यासी क्षेत्र ० हे. १.५ आर त्यांचा ग्रामपंचायत असेसमेंट नं. ६६ यासी चतुसिमा.

Assistant Superintendant
Civil Court, Peth Vadgaon.

पुर्वेस — प्लॉट नं. ६७ ची मिळकत

पश्चिमेस — रस्ता.

दक्षिणेस — रस्ता.

उत्तरेस — प्लॉट नं. ६२ ची मिळकत

ब) जिल्हा कोल्हापुर, ता.हातकणंगले, मौजे पारगाव येथील सि. स.नं. १३१ क्षेत्र ९४.२० चौ.मी यासी चतुसिमा.

पुर्वेस — सि.स.नं. १२८ ची मिळकत

पश्चिमेस — रस्ता

दक्षिणेस — रस्ता

उत्तरेस — सि.स.नं. १३० ची मिळकत

क) जिल्हा कोल्हापुर, ता.हातकणंगले, मौजे पारगाव येथील सि. स.नं. १६५ एकुण क्षेत्र ३८५ चौ.मी यापैकी ५५.०० चौ.मी क्षेत्र यासी चतुसिमा.

पुर्वेस — सि.स.नं. १७० ची मिळकत

पश्चिमेस — सि.स.नं. १६० ची मिळकत

दक्षिणेस — सि.स.नं. १६४ ची मिळकत

उत्तरेस — गट नं. २० ची शेत मिळकत

ड) जिल्हा कोल्हापुर, ता.हातकणंगले, मौजे पारगाव येथील सि. स.नं. १६७ क्षेत्र २८ चौ.मी यापैकी १४ चौ.मी क्षेत्र यासी चतुसिमा.

पुर्वेस — रस्ता.

पश्चिमेस — रस्ता

दक्षिणेस — सि.स.नं. १६६ ची मिळकत

उत्तरेस — सि.स.नं. १६८ ची मिळकत

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

इ) मा.दुय्यम निंबधकसो श्रेणी १ हातकणंगले यांचे कार्यालयात दि. २९/०२/२००८ इ. रोजी मौजे पारगाव, ता. हातणकणंगले, जि.कोल्हापुर येथील ग्रामपंचायत मिळकत नं. ६६ क्षेत्र १३०० चौ.फुट (२००८ हे तथाकथित खरेदीपत्र)

२) यातील वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ हे कै. धोंडु ज्ञानु चाळके यांचे सरळ व कायदेशीर वारस असुन तशी नोंद फेरफार नं. २६२५५ ने गट नं. ९२४/अ/२ च्या ७/१२ पत्रकी झालेली आहे.

वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांची वंशावळ खालीलप्रमाणे.

**धोंडीराम ज्ञानु चाळके (मयत)**

- यशोदा (वादी)
- बाबुराव (प्र.वादी नं.१)
  - नवसाबाई (प्र.वादी नं.१अ)
  - अनिल (प्र.वादी नं.१ब)
  - छाया (प्र.वादी नं.१क)
- शिवाजी (प्र.वादी नं.२)
- रंगराव (प्र.वादी नं.३)
- विलास (प्र.वादी नं.४)
- मालुबाई (प्र.वादी नं.५)
- शालन (प्र.वादी नं.६)

यातील वादी व प्रतिवादी नं. ५ व ६ या मयत धोंडी ज्ञानु चाळके यांच्या मुली असुन प्रतिवादी नं. १ ते ४ ही मुले आहेत. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा व हक्कज्ञापनाचा व मनाईचा असल्या कारणाने प्रतिवादी नं. १ ते ६ यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करून घेतले आहे. तसेच यातील प्रतिवादी नं. २ शिवाजी धोडी चाळक यांनी बनावट व खोटी कागदपत्रे करून बनावट असेसमेंट च्या आधारे प्रतिवादी नं. ७ व ८ यांना याकामी पक्षकार केले आहे.

३) यातील वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांचे पुर्वहक्कदार कै. धोंडी ज्ञानु चाळके यांची वर दावा अर्जी कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या वाडवडिलार्जित हिंदु एकत्र कुटुंबाच्या मालकी व कब्जे वहीवाटीच्या मिळकती आहेत. कै.धोंडी ज्ञानु चाळके हे दि. १८/०३/१९८८ इ. रोजी मयत झाले असुन त्यांचे

Assistant Superintendant
Civil Court, Peth Vadgaon.

मृत्यु पश्चात त्यांचे सर्व कायदेशीर वारस म्हणुन वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांचे नावे वर नमुद दावा अर्जी कलम १अ या मिळकतीच्या मालकी हक्कात फेरफार नं. २६२५५ ने दि. २६/९/२०२५ इ. रोजी नोंद करण्यात आली आहे. तर उर्वरित मिळकतीच्या मालमत्तापत्रकी वारसांची नोंद होणेचे राहुन गेले आहे. परंतु सर्व मिळकतीमध्ये सर्व वारसांची कब्जेवहीवाट चालु होती व आहे.

४) वास्तविक यातील वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांचे नावावरती अन्य वाडवडिलार्जित हिंदु एकत्र कुटुंबाच्या मालकी व कब्जेवहीवाटीच्या मौजे पारगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापुर येथील गट नं. ३४४, ३४८, १२११ हिस्सा नं. ६, १२६७ हिस्सा नं. ६, १२६७ हिस्सा नं. ८, १२७०, १२१३ व १२४८ या सर्व शेत मिळकतीमधील वादी व प्रतिवादी नं. ५ व ६ यांनी त्यांचा हक्क दि. ३/४/२००१ इ. रोजी र.द.नं. १९७०/२००१ या रजि हक्कसोडपत्राने सोडलेला आहे. सदरचा दस्त हा मा. दुय्यम निंबधकसो हातकणंगले यांचे कार्यालयात नोंदविण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत मिळकतीचा उल्लेख अगर प्रस्तुत मिळकतीमध्ये वादी यांनी वाटप करून मागितलेले नाही.

५) यातील वादी यांनी वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या दावा मिळकतीमधील त्यांना वारसा हक्काने मिळालेले हक्क व अधिकार केव्हाही सोडलेले नव्हते व नाही. अगर वर कलम १ मध्ये नमुद दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांचे दरम्यान केव्हाही वाटप झालेले नव्हते व नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा यातील वादी यांनी प्रतिवादी नं १ ते ६ यांचे विरूध्द वाटपासाठी, मनाईसाठी व हक्कज्ञापनासाठी मे. कोर्टात दाखल केला आहे.

६) दावा अर्जी कलम १अ या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांच्या नावाची नोंद वारस म्हणुन झालेली आहे. यावरून हे स्पष्ट होत आहे की, दावा अर्जी कलम १अ मध्ये वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांचा प्रत्येकी १/७ हक्क व हिस्सा आहे. तसेच दावा अर्जी कलम १ब,१क व १ड या मिळकतीच्या मालमत्तापत्रकी वादी व प्रतिवादी यांची नावे

Assistant Superintendant
Civil Court, Peth Vadgaon.

नसली तरी सदर मालमत्तापत्रकी वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांचे पुर्वहक्कदार धोंडी ज्ञानु चाळके यांच्या नावाची नोंद आहे. त्यामुळे वारस म्हणुन वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांचा दावा अर्जी कलम १ब ते ड या दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी १/७ हक्क व हिस्सा आहे. सदर हिस्साप्रमाणे यातील वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांना दावा अर्जी कलम १ मधील मिळकती ज्याच्या त्याच्या हक्काप्रमाणे व हिस्साप्रमाणे तुटक वाटप होवुन मिळाव्यात याकरीता प्रस्तुतचा दावा वादी यांनी मे. न्यायालयात दाखल केला आहे.

७) प्रस्तुत दाव्यातील दावा अर्जी कलम १अ ही मिळकत वादी यांचे पुर्वहक्कदार यांना मा.उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग कोल्हापुर यांचेकडील आदेश क्र. भु/संपा/गावठाण/वशि/५७३/८५ दि. २४/९/१९८५ इ. रोजीच्या आदेशाने गावठाण वाढ विस्तार योजना अंतर्गत मिळालेला भुखंड आहे. सदर भुखंड स्विकारतेवेळी वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांचे पुर्वहक्कदार कै. धोंडी ज्ञानु चाळके यांनी शासनाचे अटी व शर्थीस अधिन राहुन प्रस्तुतचा भुखंड स्विकारलेला आहे. दाव अर्जी कलम १अ या मिळकतीचे ७/१२ पत्रकी आज देखील भोगवटादार वर्ग २ अशी नोंद असुन इतर अधिकारामध्ये सक्षम प्राधिकार्याच्या पुर्व परवानगीशिवाय हस्तांतरणास बंदी अशी नोंद आहे. त्यामुळे सदरच्या मिळकतीचे शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय हस्तांतरण होवु शकत नाही किंवा तसे हस्तांतरण झालेस सदरचे हस्तांतरण बेकायदेशीर व पोकळ होते.

८) अशी सर्व परिस्थिती असताना यातील प्रतिवादी नं. २ यांच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा घेवुन व शासनाची आणि वादी व इतर वारसांची फसवणुक करण्याच्या उद्देशाने यातील प्रतिवादी नं. ७ व ८ यांनी ग्रामपंचायतीमधील कर्मचा—यांना हताशी धरून प्लॉट नं.इ ६६ चा बोगस असेसमेंट बनवुन बनावट असेसमेंटच्या आधारे दि. २९/२/२००८ इ. रोजी मा. दुय्यम निंबधक श्रेणी १ यांच्या कार्यालयात र.द.नं. ११३१/२००८ हे बनावट व पोकळ

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

खरेदीपत्र नोंदवुन घेतले आहे. सदरची प्रतिवादी नं. ७ व ८ यांची कृती बेकायदेशीर व शासनाची घोर फसवणुक करणारी होती व आहे. त्यामुळे सदरचा बोगस दस्त रद्द होणे गरजेचे व आवश्यक आहे. तसेच सदर बोगस दस्ताचे आधारे कोणाताही कर्ज बोजा, हस्तांतरण, बांधकाम, तबदील प्रतिवादी नं. ७ व ८ यांनी करू नये. म्हणुन कायम व तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादी नं. ७ व ८ अगर तर्फे इसमांचे विरूध्द होणे गरजेचे व आवश्यक आहे.

९) सदर र.द.नं. ११३१/२००८ या दस्तात वादी अगर इतर कोणत्याही वारसांची सहमती अगर मान्यता घेतलेली नव्हती अगर सदर दस्तामध्ये दावा अर्जी कलम १अ या मिळकतीचा कोणताही उल्लेख नसताना यातील प्रतिवादी नं. ७ व ८ यांनी दावा अर्जी कलम १अ या मिळकतीचा ऐनकेन प्रकारे कब्जा घेणेचा प्रयत्न चालु केला आहे. त्यामुळे वादी यांचे दावा मिळकतीमधील हक्क व अधिकारावरती गदा येत आहे. त्यामुळे वादी यांचे दावा मिळकतीमधील हक्क व अधिकारावरती गदा येत आहे. तसेच वादी यांचा हक्क व अधिकार नष्ट होणार आहे. त्यामुळे सदरचा दस्त वादी यांचे हक्क व अधिकारावर बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होवुन मिळावे.

१०) दावा अर्जी कलम १अ मधील मिळकतीचे ग्रामपंचायत मधील असेसमेंट वरती सर्व वारसांची नावे नोंद करणे करीता यातील वादी यांनी दि. २४/४/२०२५ इ. रोजी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत जुने पारगाव यांचेकडे अर्ज केला असता ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच ग्रामपंचायत जुने पारगाव यांनी वादी यांचा अर्ज निकाली काढुन मिळकतीवर श्री. प्रताव व रणजीत जयवंत लोंढे यांचा मालकी हक्क नसुन आपला स्वमालकी हक्क व मयत धोंडी ज्ञानु चाळके यांचे वारस असलेबाबत तसा आदेश योग्य त्या न्यायालयातुन ग्रामपंचायत जुने पारगांव ला सादर करण्यात यावा त्यानंतर आपला ग्रामपंचायत मिळकत नं. ६६ नंबर बाबत आपल्या अर्जाबाबत निर्णय घेतला जाईल अशी लेखी सुचना केली आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा मे. न्यायालयात दाखल करणे भाग पडले आहे.

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon

११) वर नमुद प्रकरणाची चौकशी यातील वादी यांनी प्रतिवादी नं. १ ते ४ यांचेकडे दि. ४/१०/२०२५ इ. रोजी केली असता यातील प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी कोणतीही योग्य माहीती न देता वादी यांना उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. त्यावेळी यातील वादी यांनी यातील प्रतिवादी नं. १ ते ४ यांचेकडे वर नमुद दावा मिळकतीमध्ये त्यांचा असणारा १/७ हक्क व हिस्सा सरस निरस मानाने वाटुन मागितला होता. परंतु यातील प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी सदरचा हक्क व हिस्सा देणेस टाळाटाळ करून नकार दिला. तसेच यातील वादी यांनी प्रतिवादी २, ७ व ८ यांना ॲड. कैलास पाटील यांचे मार्फत दि. १०/२/२०२६ इ. रोजी नोटीस पाठवुन सदरची नोटीस मिळालेपासुन ७ दिवसांचे आत र.द.नं. ११३१/२००८ हे खरेदीपत्र रद्द करून वर नमुद मिळकतीचा ताबा वादीना सुस्थितीत परत करावी अशी विनंती केली होती. परंतु सदरची नोटीस मिळुन देखील प्रतिवादी २, ७ व ८ यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे देखील प्रस्तुत दावा तुटक वाटप करून मिळकतीचा ताबा मागणीकरीता प्रस्तुतचा दावा मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

१२) **अर्जास कारण :—**

प्रस्तुत दावा मिळकती या वादी व प्रतिवादी नं. १ ते ६ यांची वाडवडिलार्जित हिंदु एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. दावा अर्जी कलम १अ मधील मिळकतीचे ग्रामपंचायत मधील असेसमेंट वरती सर्व वारसांची नावे नोंद करणे करीता यातील वादी यांनी दि. २४/४/२०२५ इ. रोजी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत जुने पारगाव यांचेकडे अर्ज केला असता ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच ग्रामपंचायत जुने पारगाव यांनी वादी यांचा अर्ज निकाली काढुन मिळकतीवर श्री. प्रताव व रणजीत जयवंत लोंढे यांचा मालकी हक्क नसुन आपला स्वमालकी हक्क व मयत धोंडी ज्ञानु चाळके यांचे वारस असलेबाबत तसा आदेश योग्य त्या न्यायालयातुन ग्रामपंचायत जुने पारगांव ला सादर करण्यात यावा त्यानंतर आपला ग्रामपंचायत मिळकत नं. ६६ नंबर बाबत

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

आपल्या अर्जाबाबत निर्णय घेतला जाईल अशी लेखी सुचना दि. २/७/२०२५ इ. रोजी केली आहे. वर नमुद प्रकरणाची चौकशी यातील वादी यांनी प्रतिवादी नं. १ ते ४ यांचेकडे दि. ४/१०/२०२५ इ. रोजी केली असता यातील प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी कोणतीही योग्य माहीती न देता वादी यांना उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. त्यावेळी यातील वादी यांनी यातील प्रतिवादी नं. १ ते ४ यांचेकडे वर नमुद दावा मिळकतीमध्ये त्यांचा असणारा १/७ हक्क व हिस्सा सरस निरस मानाने वाटुन मागितला होता. परंतु यातील प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी सदरचा हक्क व हिस्सा देणेस टाळाटाळ करून नकार दिला. तसेच यातील वादी यांनी प्रतिवादी २, ७ व ८ यांना ॲड. कैलास पाटील यांचे मार्फत दि. १०/२/२०२६ इ. रोजी नोटीस पाठवुन सदरची नोटीस मिळालेपासुन ७ दिवसांचे आत र.द.नं. ११३१/२००८ हे खरेदीपत्र रद्द करून वर नमुद मिळकतीचा ताबा वादीना सुस्थितीत परत करावी अशी विनंती केली होती. परंतु सदरची नोटीस मिळुन देखील प्रतिवादी २, ७ व ८ यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे हे स्पष्ट होत आहे की प्रतिवादी यांना दावा मिळकत कोणत्याही परिस्थीत वादी यांना द्यावयाची नाही. त्यामुळे देखील प्रस्तुत अर्ज मनाई मागणेकरीता दाखल करणे भाग पडले आहे.

१३) प्रस्तुत दावा मिळकतीवरती प्रतिवादी यांनी कर्ज बोजा केलेस अगर तबदीली केलेस दाव्याचे स्वरूप बदलणार असुन मल्टीप्लिसिटी ऑफ प्रोसेडीग होणार आहे. त्यामुळे वादी यांचे हक्क, हिस्से व अधिकारावर गदा येण्यार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्वरित चालुन प्रतिवादी यांचे विरूध्द मनाई आदेश होणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

१४) प्रस्तुत दाव्यात यातील वादी यांना अंतिम यशाची खात्री आहे.

१५) न्यायाचे समतोलत्व यातील वादी यांचे बाजुने आहे.

Assistant Superintendant
Civil Court, Peth Vadgaon.

१६) यातील वादी हे मागतात त्या प्रमाणे मनाई दिलेस प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणार नाही. परंतु वादी यांचे मागणीप्रमाणे मनाई न मिळालेस वादी यांचे कधीही व कशानेही न भरून होणारे नुसार होणार आहे

१७) यातील वादी यांना कॅव्हेटची नोटीस नाही.

**१८) सबब विनंती की,**

अ) प्रतिवादी नं. १ ते ६ यांनी दावा अर्जी कलम १अ ते ड या मिळकतीवरती कर्ज बोजा, विक्री किंवा हस्तांतर करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादी नं. १ ते ६ अगर तर्फे इसमांचे विरूध्द व्हावा.

ब) उपरोक्त कलम १ ते ९ मध्ये नमुद केलेली सर्व कथने व मजकुर यांचा विचार होता दावा अर्जी कलम १अ या मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. ७ व ८ अगर तर्फे इसमांनी कोणत्याही प्रकारचे बांधकाम अगर तबदीली करू नये, कर्ज बोजा करू नये, हस्तांतरण अगर विक्री करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादी नं. ७ व ८ अगर तर्फे इसमांचे विरूध्द व्हावा व तसा ठराव व हुकुमनामा व्हावा.

क) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

ड) इतर अनुषंगीक दादी याच कामी वादी याचे हक्कात व्हाव्यात.

येणेप्रमाणे अर्ज असे.

वडगाव

ता. २६/०२/२०२६

Drafted & Presented
Adv. K. G. Patil

**यशोदा उर्फ सखुबाई सर्जेराव चिखलकर**

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

# प्रतिज्ञा

मी यातील **वादी यशोदा उर्फ सखुबाई सर्जेराव चिखलकर व.व. ७१, धंदा. गृहीणी, रा. थेरगाव, जि. शाहुवाडी, जि. कोल्हापुर** सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील मनाई अर्जातील टंक लिखीत केलेला संपुर्ण मजकूर हा मी स्वत: लिहीता वाचता येत असल्यामुळे वाचून पाहिला असून संपुर्ण मजकूर हा माझे सांगणेप्रमाणे टंक लिखीत केला असून तो खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.

वडगाव

ता. २६/०२/२०२६

# ॲफिडेव्हीट

मी यातील **वादी यशोदा उर्फ सखुबाई सर्जेराव चिखलकर व.व. ७१, धंदा. गृहीणी, रा. थेरगाव, जि. शाहुवाडी, जि. कोल्हापुर** ईश्वर साक्ष खरे कथन करते की, वरील मनाई अर्जातील टंक लिखीत केलेला संपुर्ण मजकूर हा मला स्वत: लिहीता, वाचता येत असल्यामुळे वाचून पाहिला असून संपुर्ण मजकूर हा माझे सांगणेप्रमाणे टंक लिखीत केला असून तो खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हीट.

वडगाव

ता. २६/०२/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

Assistant Superintendant
Civil Court, Peth Vadgaon.

# प्रतिज्ञा

मी यातील **वादी यशोदा उर्फ सखुबाई सर्जेराव चिखलकर व.व. ७१, धंदा. गृहीणी, रा. थेरगाव, ~~जि.~~ ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर** सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील मनाई अर्जातील टंक लिखीत केलेला संपुर्ण मजकूर हा मी स्वत: लिहीता वाचता येत असल्यामुळे वाचून पाहिला असून संपुर्ण मजकूर हा माझे सांगणेप्रमाणे टंक लिखीत केला असून तो खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.

वडगाव

ता. २६/०२/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri Yashoda @ Sakhubai Sarjerao Chikhalkar.
Age 71 of Thergaon Ta. who is Shahuwadi.
identified by Shri K.G. Patil Adv.
.............whom I know personally
Dated :- 26/2/26

Assistant Superintendent